# मेट्रो ३ : ट्रॅक टाकण्याचे काम ३१ टक्के पूर्ण

## बोगदे खोदण्याची ९९ टक्के कामे पूर्ण



मुंबई : मेट्रो ३ प्रकल्पासाठी ट्रॅक टाकण्याचे काम सुरू आहे.

**मुंबई :पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ प्रकल्पाअंतर्गत रेल्वे ट्रॅक टाकण्याचे काम वेगाने सुरू असून २३ जून २०२२ पर्यंत ट्रॅकची ३१ टक्के कामे पूर्ण करण्यात आली आहेत. बुधवारी सिप्झ, एमआयडीसी आणि सिद्धिविनायक मंदिर स्थानकातील ट्रॅकचे काम १०० टक्के पूर्ण झाले.

मेट्रो ३ हा भूमिगत प्रकल्प असून बोगदे खोदण्याची ९९ टक्के कामे पूर्ण झाली असून आता अन्य कामे सुरू आहेत. दादर, शितलादेवी मंदिर, मरोळ नाका आणि विधानभवन स्थानकात ट्रॅक टाकण्याचे एका दिशेचे काम पूर्ण झाले आहे. आता दुसऱ्या दिशेने ट्रॅक टाकण्याचे काम सुरू आहे.

कोरोना काळात मेट्रो अनेक मजूर गावी परतले होते. कोरोनाकाळ ओसरल्यानंतर बहुसंख्य मजूर पुन्हा प्रकल्पस्थळी आले. त्यामुळे कामे अहोरात्र सुरू आहेत. ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कंपने जाणवू नयेत यासाठी कंपन विरहित ट्रॅक टाकले जात आहेत. हे ट्रॅक उपनगरीय रेल्वे किंवा अन्य मेट्रो मार्गापेक्षा भिन्न आहेत. अनेक ठिकाणी ट्रॅक टाकण्यात आले असून जोडणीची कामे सुरू आहेत.ज्या ठिकाणी ट्रॅक टाकण्यात आले आहेत,तिथे ओव्हरहेड वायर टाकण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. स्थानके उभारण्याची कामेही वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## मेट्रो १ चे स्थानक ब्रँडिंग जोरात

घाटकोपर वर्सोवा मेट्रो १ मार्गावरील आठ स्थानकांना त्यांच्या मूळ नावासह खाजगी आस्थापना तसेच कंपन्यांची नावे देण्यात आली आहेत. स्टेशन ब्रँडिंगच्या माध्यमातून मेट्रो १ने हा उपक्रम सुरू केला आहे. ब्रँडिंगमुळे मेट्रो १ ला महसुलही मिळत आहे. इंडसइंड बँक चकाला जे.बी. नगर, घाटकोपर विव्हो, मेडिमिक्स आझाद नगर, टेक्नो मरोळ नाका, एलआयसी, बिसलेरी आदी नामविस्तार झाला आहे.